पुढारी

# एकत्र येऊन काम केल्यास भारत विश्वगुरू होईल!

## ज्ञानेश्वर मुळे : कुडाळात रवळनाथ हाऊसिंग सोसायटीचा स्नेहमेळावा

**कुडाळ : पुढारी वृत्तसेवा**

जगात भारताचा प्रभाव वाढत आहे. जगातील अनेक महत्त्वाच्या बैठकांमध्ये भारताला निमंत्रण दिले जात आहे. आज जगातील अनेक मोठ्या वित्तीय संस्थांमध्ये भारतीय लोक आहेत. या लोकांनी देशासाठी एकत्र येत भारताची वित्तीय प्रगती होण्यासाठी प्रयत्न केले तर भारत विश्वगुरू होईल, असे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव तथा राष्ट्रीय मानवाधिकार आयोग नवी दिल्लीचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे यांनी कुडाळ येथील स्नेहमेळाव्यात बोलताना केले.

रवळनाथ को.ऑप.हौसिंग फायनान्स सोसायटी आजरा मल्टीस्टेटचा सभासद, ठेवीदार,



**स्नेहमेळाव्यात बोलताना ज्ञानेश्वर मुळे. (छाया : राजाराम परब)**

ग्राहक, हितचिंतक यांचा स्नेहमेळावा कुडाळ येथील मराठा समाज सभागृहात झाला. यावेळी श्री. मुळे बोलत होते. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे प्राचार्य डॉ.बी. एम. हिर्डेकर, नगराध्यक्ष आफ्रिन करोल, उपनगराध्यक्ष मंदार शिरसाट, सोसायटीचे संस्थापक श्री.चौगुले, तहसीलदार अमोल पाठक, बी.के.मायदेव, श्रीकांत सावंत आदी उपस्थित होते.

श्री. मुळे म्हणाले, आज गेल्या काही वर्षात विज्ञानाने एकही नोबेल मिळवलेले नाही. आज देशात एक लाख उत्तम लोकांचा मेंदू अमरिकेला निर्यात करण्यात आला आहे. वीस हजार विद्यार्थी युक्रेनमध्ये शिक्षण घेत आहेत हे आपल्याला माहितही नाही. याला आपली शिक्षण प्रक्रिया, चुकीची शिक्षण पद्धती कारणीभूत आहे. देशातील अनेक जण आपल्या मुलांना परदेशात शिक्षणासाठी पाठवून मानसिक व शारिरिक एकाकीपणा सहन करत आहेत. हा ट्रेंड बदलला पाहिजे. असे सांगितले. संविधानात न्याय, स्वातंत्र्य, समता, यांचा समावेश आहे. त्यावर सर्व व्यक्तींचा अधिकार आहे. हे सर्वांना देण्याची जबाबदारी न्यायमंडळ, विधीमंडळ व कार्यकारी मंडळ या महत्त्वाच्या स्तभांची असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी डॉ. बी. एम. हिर्डेकर,तहसीलदार अमोल पाठक, नगराध्यक्ष आफ्रिन करोल यांनी मनोगत व्यक्त केले. आभार श्री. गुरबे यांनी मानले.

Sindhudurg Edition
Mar 29, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# सर्वसामान्यांनी निवडणूक लढविणे आवश्यक

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : कुडाळात 'रवळनाथ हौसिंग फायनान्स'चा स्नेहमेळावा उत्साहात

कुडाळ, ता. २६ : भारत एकीकडे प्रगती करत असताना दुसरीकडे चित्र पाहिल्यास आज संवादात जनता कुठे आहे? हा सवाल उपस्थित होतो. संवादाचा विसंवाद झाल्याने आपण प्रगती करू शकत नाही. अनेक राजकीय नेते भ्रष्टाचारामुळे तुरुंगात जातात. हे चित्र आपल्याला बदलायचे असेल, तर उत्तमोत्तम लोक निवडून देणे काळाची गरज आहे. यासाठी आता सर्वसामान्य माणसांनी निवडणूक लढविली पाहिजे. राजकारणात वाईट माणसाला थारा न देणे ही आपली जबाबदारी आहे. चांगुलपणाचे चित्र भविष्यात दिसले पाहिजे. भारत विश्वगुरू झाला पाहिजे, असे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी आज सायंकाळी रवळनाथच्या स्नेहमेळावा कार्यक्रमात केले.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्य महोत्सवानिमित्त कोकणातील सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतकांचा स्नेहमेळावा आज मराठा समाज सभागृह, कुडाळ येथे आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मुळे होते. यावेळी माजी परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे प्राचार्य डॉ बी. एम. हिर्डेकर, तहसीलदार अमोल पाठक, नगराध्यक्ष आफरीन करोल, उपनगराध्यक्ष मंदार शिरसाट, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, कुडाळ शाखा चेअरमन प्राचार्य डॉ. सिध्देश्वर डिसले, सीईओडीके मायदेव प्राचार्य डॉ. श्रीकांत सावंत, व्ही. के. मायदेव शाखा सल्लागार प्रा. मनोहर गुरबे, प्रा. अजय चव्हाण, प्रा. डॉ. एस. टी. आवटे, सीए सागर तेली, राजेंद्र केसरकर, अशोक येजरे, सानिका मदने, मोहन होडावडेकर, ॲड. सुहास सावंत, ॲड. निलांगी रांगणेकर, रुपाली शिरसाट, कुडाळ शाखाधिकारी विक्रम जांभेकर यांच्यासह आजरा, गडहिंग्लज, कोल्हापूर आदी भागातील संचालक, ठेवीदार, नागरिक आदी उपस्थित होते.




कुडाळ : स्नेहमेळाव्याचे उद्‌घाटन करताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. शेजारी डॉ. हिर्डेकर, तहसीलदार अमोल पाठक आदी. (छायाचित्र : अजय सावंत)

डॉ. मुळे म्हणाले, " ज्येष्ठ साहित्यिक आरती प्रभूंच्या स्पर्शाने पुनित झालेल्या या भूमीत येण्याचा योग या रवळनाथच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आला. रवळनाथ ही एक शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यवस्थापन बहुविध जोपासणारी संस्था असून त्याचा ब्रँड ॲम्बॅसीडर मी आहे. देशात केंद्रशासित प्रदेशात या संस्थेची वाटचाल असली पाहिजे. यासाठी काम केले पाहिजे. २४ × ७ अशी सेवा देणाऱ्या सर्वच सहकारी संस्थांनी रवळनाथचा आदर्श घेतला पाहिजे. कारण महाराष्ट्र राज्यात अनेक सहकारी संस्था आल्या. अनेक सहकारी संस्थांची होळी कशी झाली आणि धुळीस कशा गेल्या, हे आपल्या सर्वांनाच माहिती आहे. सहकाराचा आत्मा गमावून बसल्या आहेत; मात्र रवळनाथने या पलीकडे जाऊन सहकार चळवळ वृद्धिंगत करून जी समाजात सामाजिक बांधिलकी जोपासली, त्याचा आदर्श सर्वांनीच घेतला पाहिजे. घरासाठी कर्ज देणाऱ्या या संस्थेचे कार्य महान आहे. विशेष म्हणजे ही संस्था राजकारणविरहित आहे, याचा अभिमान मला आहे. भारत एकीकडे प्रगती करत असताना दुसरी बाजू शोषणाची आली, सरंजामी संपून लोकशाही आली, तरी वास्तवातील विकृतपणा गेलेला नाही. लोकशाहीचे फायदे या राजकारणामुळे कित्येकांना मिळालेले नाहीत. सर्वत्र विसंगती आहे. अन्याय, अत्याचार, विसंगती, गरिबी यावर एकमात्र उपाय झालेला नाही. संसदेत बॅ. नाथ पै यांच्यानंतर वाक्पटू झाला नाही. प्रा. मधू दंडवते हे आदर्श आहेत. चांगुलपणाची चळवळ जनतेमध्ये रुजवायची असेल, तर सर्व प्रकारच्या नेतृत्वाला प्रशिक्षणाची गरज असते." सेवानिवृत्तीपर माजी चेअरमन प्रा. डॉ. सावंत, प्रसाद पडते, गुणवंत विद्यार्थी सौरभ गवंडे यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांची ओळख अशोक येजरे यांनी केली. सूत्रसंचालन सानिका मदने यांनी,

### संस्थेची सामाजिक बांधिलकी

चौगुले म्हणाले, "रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी ही घरासाठी कर्ज देणारी संस्था आहे. हे कार्य करतानाच सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक आदी सर्व क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने मदतीसाठी काम करत आहे. कुडाळ व रवळनाथचे एक वेगळे ऋणानुबंध जुळले आहेत. विशेष म्हणजे ही संस्था राजकारण विरहित आहे. तुमच्या ठेवी नको, कर्ज घ्या आणि घरे बांधा, हा आमचा उद्देश आहे. येथील कर्जदारांनी ठेवीसुद्धा ठेवून आमच्यावर विश्वास ठेवला. हा तुमचा विश्वास ढासळू देणार नाही. रवळनाथ ठेवी कर्जापुरती मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी सुद्धा जोपासली आहे."